# अकोला महानगरपालिका, अकोला

## विकास परवानगी आदेश

## आरंभ प्रमाणपत्र

**(Commencement Certificate)**

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 45 अन्वये व मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 253,254 बाबत)

प्र.क्र. 14/18/19-20
दिनांक - 6/03/2020

प्रति,

श्री गोपीचंद राधाकिसन बाजोरीया व इतर 03
रा. अकोला

कामाचे वर्णन

अकोला येथील **मौजे अकोली बु.** येथे सर्व साधारण शर्ती व अटीनुसार सोबतचे नकाशा प्रमाणे **तळमजला+04 चे निवासी** वापराचे बांधकाम करण्यासाठी पुढील शर्तीस अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

1.अकोला शहराच्या **मौजे अकोली बु.** येथील **सर्व्हे क्रं. 10/6 भुखंड क्रं. 3A+3B+3C/1** चे जागेवर सोबतच्या मंजूर नकाशानुसार बांधकाम करणसाठी परवानगी देण्यात येत आहे.

2.सदर बांधकामास नकाशा प्रमाणे ज्योत्यापर्यंत बांधकाम परवानगी देण्यांत आली आहे नंतर सदर बांधकाम हे नियमाप्रमाणे व नकाशाप्रमाणे आहे असे प्रमाणपत्र दाखल करुन पुढील बांधकामास परवानगी घ्यावी.

3.मंजूर झालेल्या नकाशानुसार जागेचा विकास करण्यात यावा, त्यात या महानगरपालिकेची लेखी व स्पष्ट परवानगी शिवाय कोणताही बदल करु नये.

4.संदर्भित जागेच्यावर उल्लेखिल्याप्रमाणे विकास करण्यास ह्या प्रमाणपत्रा अन्वये जी परवानगी देण्यात आली आहे ती फक्त नगररचनेच्या दुष्टीकोणातून देण्यात आली आहे. सदर जागेवरील आवेदकाच्या मालकी हक्कास मंजूरी देण्यात आली असा या प्रमाणपत्राचा अर्थ नाही किंवा तसा हक्क या परवानगी आदेशामुळे प्राप्तही होऊ शकत नाही.

5.महानगरपालिकेच्या जागेवर किंवा कोणत्याही रस्त्यावर, गल्लीत, सरकारी जागेवर, नझूल जागेवर अथवा कोणाच्या खाजगी जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करण्यात आल्यास त्या अतिक्रमणाची जबावदारी अर्जदारावर राहील.

6.श्रीमती प्रेमाबाई उमाशंकर यादव, श्रीमती कमलाबाई रामदेव यादव, श्रीमती छोटीबाई महादेव यादव यांचे प्रत्येकी क्षेत्र 1393.00 चौ.मी. एकूण क्षेत्र 4179 चौ.मी. साठी दिनांक 02.11.2013 रोजी अनुक्रमे प्रकरण क्रं.14क/145/13-14, प्रकरण क्रं.14क/222/11-12, प्रकरण 14क/255/12-13 अन्वये केलेले गुंठेवारी नियमीतीकरण रद्द करण्यात आले आहे. त्या ऐवजी अर्जदारांच्या मागणीनुसार गुंठेवारी ऐवजी नियमीत(Regular) विकास परवानगी तसेच रेखांकन परवानगी यापत्राने देण्यात आली आहे.

7.इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यावर त्या इमारतीच्या उपयोगासाठी महानगरपालिकेची परवानगी मिळाल्याशिवाय सदर इमारतीचा वापर सुरु करु नये.

8.या पत्रान्वये देण्यात आलेली परवानगी एक वर्षापर्यंतच अंमलात राहील.

9.प्रस्तावीत इमारतीचे ज्योत्यापर्यंतचे बांधकामाचे प्रमाणपत्र मागणी करण्यापुर्वी संदर्भित रेखांकना खालील जागेची बिनशेती भुखंड मोजणी करुन असा सिमांकित मोजणीचा नकाशा अर्जदाराने सादर करणे आवश्यक राहील.

10.इमारतीचे सांडपाणी अस्तित्वात असलेल्या महानगरपालिकेच्या नालीस जोडावे अथवा स्वःखर्चाने सोकपिट बांधावा.

11.भुकप रोधक नियमाचे पालन करावे.

12.मोजणी झाल्यानंतर मोजणी नुसार बिनशेती भुखंडाचा स्वतंत्र 7/12 उतारा कलम 42अ नुसार नोंद घेऊन (डीपी रस्ता, खुली जागा, भुखंड याचे क्षेत्रफळ स्वतंत्रपणे दर्शवून) असा 7/12 उतारा/ उतारे ज्योते प्रमाणपत्र मागणीपुर्वी सादर करणे आवश्यक आहे. त्या खेरीज ज्योत्यापुढील बांधकाम परवानगी देण्यात येणार नाही.

13.बांधकाम पुर्ण झाल्यावर बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करुन भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये. अन्यथा बांधकाम पुर्ण झाल्यापासून रु.300/- प्रतिदिन दंड आकारण्यात येईल.

14.छतावरील पावसाच्या पाण्याचे संकलम (रेनवॉटर हार्वेस्टींग) करणे करिता उपायोजना करणे आवश्यक राहील. सदर तरतुद आपण केले नसल्याचे गृहीत सदर परवानगी ओदश व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल.

15.बांधकामामध्ये फ्लाय ॲश विटा व फ्लाय ॲश आधारीत साहित्याचा वापर करणे बंधनकार राहील.

16.रेखांकना क्षेत्रातील विकास योजना रस्ता (डीपी रोड) खालील क्षेत्राचा चटई निर्देशांक अर्जदारांनी याच जागेमध्ये वापरला आहे. डीपी रस्त्याचे क्षेत्र, मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्रं.27.2 च्या तरतुदीनुसार अर्जदारांनी विनामोबदला महानगरपालिकेस तत्काळ हस्तांतर करावे.

Scanned with CamScanner

17.मालकी हक्काबाबत व जागेचे हद्दीबाबत वाद निर्माण झाल्यास त्यास अर्जदार स्वतः जवाबदार राहील.

18.सोबतचे मंजूर नकाशानुसार समास अंतरे सोडणे आवश्यक राहील अन्यथा सदर परवानगी रद्द समजण्यात येईल.

19.सदर इमारतीमध्ये अग्नी प्रतिबंधक उपाययोजना करणे अनिवार्य राहील. तसेच अपंगाच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे बंधनकार राहील.

20.मा.महापौर अकोला महानगरपालिका यांच्या दिनांक 28.01.2020 रोजीचे पत्र क्रं. 22/2020 या पत्रातील मुद्दा क्रं. 1 ते 5 च्या अनुषंगाने तांत्रिक छाननी सुरु आहे मात्र सदर मुद्यांच्या अनुषंगाने काही अनियमितता भविष्यात उत्पन्न झाल्यास/आढळून आल्यास दिलेली विकास परवानगी रद्द करण्यात येईल. अशा पध्दतीने दिलेली परवानगी रद्द झाल्यास अर्जदारांना कोणतीही नुकसान भरपाई मागण्याचा हक्क रहाणार नाही, या अटीवर ही विकास परवानगी देण्यात येत आहे.

21.रेखांकन क्षेत्रासाठी उपलब्ध होणारे पोहोच रस्ते प्रत्यक्षात जागेवर तयार करुन, त्यास नाले/गटारी बांधून रस्त्याचे क्षेत्र महानगरपालिकेकडे तत्काळ वर्ग करणे आवश्यक आहे.

22.विद्युत लाईन पासून सुरक्षीत अंतर सोडून बांधकाम करावे लागेल अन्यथा अपघात झाल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहील.

23.इमारत बांधकाम स्थळावर बांधकामाबाबत व परवानगी बाबत सविस्तर माहिती दर्शविणारा फलक लावणे अनिवार्य राहील.

24.सदर इमारतीमध्ये मंजूर नियमावलीतील तरतूदीनुसार Water Recycling Plant चे बांधकाम करणे बंधनकारक राहील.

**(मा.आयुक्त यांचे मंजुरीने)**

महानगरपालिका, नियोजन व विकास विभाग, अकोला
स्थापना
१-१०-२००१

**प्र.सहाय्यक संचालक, नगर रचना**
अकोला महानगरपालिका, अकोला

प्रकरण क्रं. **14/18/19-20** अन्वये मंजूर झालेल्या नकाशाची प्रत आदेश मिळाला

अर्जदाराची स्वाक्षरी

प्रतिलिपी,

1. क्षेत्रिय अधिकारी (पश्चिम झोन), मनपा अकोला
2. कराधिक्षक, कर वसुली विभाग मनपा अकोला

Scanned with CamScanner